# महाराष्ट्र शासन
## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

३०५, शासकीय तंत्र निकेतन इमारत, खेरवाडी,
अली यावर जंग मार्ग, वांद्रे, मुंबई ४०० ०५१
दुरध्वनी : ०२२ - २६४७ ६०३७ वेबसाईट : www.mahacet.org
ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com


दिनांक - ०५ मे, २०१६

## प्रेस नोट

राज्य शासनामार्फत महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर कायदयातील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकारी व आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेमार्फत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता खाजगी विनाअनुदानित, शासकीय आणि शासनअनुदानित महाविद्यालयांच्या आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश एमएचटी-सीईटी-२०१६ या सामाईक प्रवेश परीक्षेद्वारे करण्यात येणार आहेत. सदर सामाईक प्रवेश परीक्षा गुरुवार, दिनांक ५ मे, २०१६ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर प्रवेश परीक्षा महाराष्ट्रातील ३६ जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी एकूण १०५४ परीक्षा केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार न घडता सुरळीतपणे पार पडली.

सदर प्रवेश परीक्षेच्या वेळा खालीलप्रमाणे होत्या.

| विषय | परीक्षेची वेळ |
|---|---|
| भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र | सकाळी १०.०० ते सकाळी ११.३० |
| जीवशास्त्र | सकाळी १२.०० ते दुपारी १.३० |
| गणित | दुपारी ३.०० ते दुपारी ४.३० |

सदर प्रवेश परीक्षेसाठी खालीलप्रमाणे केंद्रांचे वर्गीकरण करण्यात आले होते.

१. फक्त आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमासाठी -- बी.बी. प्रकारचे केंद्र

२. फक्त अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी -- एम.एम. प्रकारचे केंद्र

३. दोन्ही अभ्यासक्रमासाठी बसू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी -- एम.बी. प्रकारचे केंद्र

एमएचटी-सीईटी-२०१६ या प्रवेश परीक्षेसाठी एकूण ४०९२७६ पात्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दती प्रवेश पत्र उपलब्ध करुन देण्यात आले होते.

प्रत्येक परीक्षा केंद्रावर आवश्यक पोलीस बंदोबस्त ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच परीक्षेच्या दिवशी प्रत्येक परीक्षा केंद्रावर १४४ कलम सकाळी ६.०० ते रात्री ८.०० वाजेपर्यंत लागू करण्यात आले होते.

सदर प्रवेश परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

- परीक्षेस अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या - ४०९२७६
- प्रवेश परीक्षेस गैरहजर असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या - ११५०८
- प्रवेश परीक्षेस हजर असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या - ३९७७६८

महाराष्ट्रातील विभागवार विद्यार्थ्यांची उपस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| विभाग | एकूण विद्यार्थी | उपस्थित विद्यार्थी | अनुपस्थित विद्यार्थी | टक्केवारी (अनुपस्थित) |
|---|---|---|---|---|
| उर्वरीत महाराष्ट्र | २५६४७९ | २४९४६० | ७०१९ | २.७ टक्के |
| मराठवाडा | ६९३९७ | ६८०३७ | १३६० | २.० टक्के |
| विदर्भ | ८३४०० | ८०२७१ | ३१२९ | ३.८ टक्के |
| एकूण | ४०९२७६ | ३९७७६८ | ११५०८ | २.८ टक्के |

एमएचटी-सीईटी-२०१६ या प्रवेश परीक्षेचा निकाल दिनांक १ जून, २०१६ पर्यंत जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या कार्यक्रमाबाबतची माहिती विद्यार्थी व पालकांकरिता वृत्तपत्रांमधून नोटीफिकेशनद्वारे जाहीर करण्यात येणार आहे.

:: :: :: ::